# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पुणे जिल्ह्यातील खंडाळा पोलीस प्रशिक्षण केंद्रात महिला प्रशिक्षणार्थींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१) ९२२५ (०७-०४-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील खंडाळा पोलीस प्रशिक्षण केंद्रात महिला प्रशिक्षणार्थीचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत्यू झालेल्या प्रशिक्षणार्थी महिलेसह इतर प्रशिक्षणार्थींना केंद्रातील वरिष्ठांनी कठोर शिक्षा केल्यानेच त्या आजारी पडल्या, हे खरे आहे काय,

(३) तसेच, थंडीतही प्रशिक्षण केंद्रात महिलांना आंघोळीसाठी थंडच पाणी दिले जाते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१७) :**(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षणार्थींना तिन्ही ऋतुंमध्ये आंघोळीसाठी गरम पाण्याची सोय करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकर (जि.नांदेड) येथील पोलीस वसाहत मोडकळीस आल्याबाबत**

**(२) ३५४२९ (२१-०१-२०१६). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) येथील पोलीस वसाहतीचे नुतनीकरण योग्य रितीने न केल्याने ही वसाहत मोडकळीस आलेली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोडकळीस आलेल्या या पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७)** :(१) व (२) भोकर (जि.नांदेड) येथील पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्याबाबत संबंधित क्षेत्रीय कार्यालयाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांना कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील कांदिवली(पूर्व) येथील पोलिसांसाठी बांधलेल्या घरांबाबत**

**(३) ४०४५९ (२०-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील मोरारजी मिल, म्हाडाच्या समोर गत अनेक वर्षापासून पोलिसांसाठी घरे बांधून तयार असूनही विकासक व गृह खाते यांच्यातील वादामुळे वापराविना असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीच्यामधून पोलीसासाठी किती घरे बांधून तयार आहेत तसेच विकासक व गृह खाते यांच्यात नेमका वाद काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तोडगा काढून पोलिसांना घरे उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे,
(२) वाढवण कांदीवली येथील पोलीस विभागासाठी आरक्षित भूखंडावर विकासकामार्फत ३४ सदनिका व एक पोलीस चौकी बांधून देण्याबाबत करारपत्र करण्यात आले होते. तथापि बांधकाम पूर्ण झाल्यावर पोलीस चौकीचे क्षेत्रफळ अनुज्ञेय क्षेत्रफळापेक्षा ११९ चौ.फुट कमी असल्याचे आढळून आले आहे. सबब, सदरहू सदनिका व पोलीस चौकीचा ताबा पोलीस विभागामार्फत घेण्यात आलेला नाही. तसेच विकासकाने सुरक्षा रक्षक, वीज व पाणी शुल्काची पोलीस विभागाकडे मागणी केलेली आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर बैठक आयोजित करुन निर्णय घेण्यात येईल.

---

**राज्य पोलीस दलात महिलांचे प्रमाण कमी असल्याबाबत**

**(४) ४१०५८ (१७-०५-२०१६). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील गुन्हेगारी सन २०१४ चा अहवाल प्रकाशित करण्यात आला त्यामध्ये पोलीस दलात महिलाना ३३% जागा राखीव असून देखील महिला पोलीसांचे प्रमाण ११.४८% असल्याचे निदर्शनास आले असून एका महिला पोलीस अधिकाऱ्या सोबत सोळा महिला पोलीस कर्मचारी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यातील पोलीस स्थानकामध्ये तक्रार नोंदविण्यासाठी येणाऱ्या महिलांना सुरक्षितता वाटावी व पोलीसांकडून अनुकूल वागणूक मिळावी यासाठी प्रत्येक पोलीस स्थानकात ८ ते १० महिला पोलीस शिपाईची नेमणूक करण्याची योजना पोलीस विभागाने आखली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे तसेच पोलीस भरती मध्ये महिलांना प्राधान्य देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१७) :**(१) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक २५.०५.२००१ व दिनांक १०.०४.२०१७ मधील तरतुदींनुसार शासकीय , निमशाकीय व शासन अनुदानीत संस्थामधील सेवांमध्ये नियुक्ती/भरतीसाठी महिलांकरीता ३०% जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. राज्य पोलीस दलामध्ये सद्यस्थितीत एकुण २,०६,०८० पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी १,६३२ महिला पोलीस अधिकारी व २४,४६४ महिला पोलीस कर्मचारी अशी एकुण २६,३९६ महिला पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. त्यानुसार राज्य पोलीस दलामध्ये महिलांचे प्रमाण १२.८०% इतके आहे.

(२) प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये २ महिला पोलीस अधिकारी व ६ महिला पोलीस शिपाई यांची नेमणूक करण्याबाबत सर्व पोलीस आयुक्त/ अधीक्षक यांना सुचना दिल्या आहेत.

(३) सर्व घटकांचा आढावा घेतला असता राज्यातील सर्व पोलीस ठाण्यामध्ये सरासरी ४ ते १४ महिला पोलीस कर्मचारी कार्यरत आहेत. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम क्र. ८ (ii) अन्वये पोलीस शिपाई पदांवरील भरतीकरीता उपलब्ध असलेल्या एकूण पदांच्या ३० टक्के पदे महिलांसाठी राखीव असतील अशी तरतूद करण्यात आली आहे. तसेच महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक २५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त व पोलीस उपनिरीक्षक या पदासाठीच्या सरळसेवा भरतीमध्ये एकूण पदांच्या ३० टक्के पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील सिडको एन-८ भागातील व्यापा-याची फसवणूक केल्याबाबत**

**(५) ५०४१४ (२०-०५-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील सिडको एन-८ भागातील श्री.अनुप अंनतराव कुलकर्णी या व्यापा-यास माहे जुलै, २०१५ ते ६ ऑगस्ट, २०१५ दरम्यान अजितकुमार, रा.बैहरीन, राहुल साकळकर रा.पुणे, उन्नीकष्णन्न रा.त्रिवेंद्रम या तिंघानी संगनमत करून नारळाचे दोन कंन्टेनर बैहरीनला निर्यात करायला लावल्यांनतर त्यांचे २३ लाख रूपये न देता फसवणूक करण्यात आल्याचे माहे दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, याबाबत सिडको पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर सुध्दा याबाबत चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) होय.

श्री.अनुप कुलकर्णी यांनी सदर प्रकरणी एकूण २२,८०,०००/- रुपयांची फसवणूक झाली असल्याची फिर्याद दिल्याने पोलीस स्टेशन, सिडको, औरंगाबाद येथे गु.र.नं. १०१/२०१६ भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) नाही.

सदर प्रकरणी आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) या प्रकरणी वेळीच कार्यवाही करुण्यात आलेली असून विलंब झालेला नाही.

---

**मानूर (ता.शिरुर, जि.बीड) येथे पोलीस चौकी उभारण्याबाबत**

**(६) ५१४२४ (१६-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानूर (ता.शिरुर, जि.बीड) येथे वाढत्या गुन्हेगारीला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस चौकी उभारण्याची मागणी सातत्याने स्थानिक नागरीक आणि मा.लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने पोलीस चौकी उभारुन आवश्यक कर्मचारी वर्गाची नेमणुक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१७) :**(१) व (२) पोलीस अधीक्षक, बीड यांनी मानूर येथे पोलीस चौकी निर्माण करणेबाबत सादर केलेला प्रस्ताव पोलीस महासंचालक यांचे स्तरावर तपासण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यात मटका सुरु असल्याबाबत**

**(७) ५७०१७ (२३-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यात मोठ्या प्रमाणात मटका सुरु असल्याचे माहे एप्रिल २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडहिंग्लज शहर व तालुक्यातील मटका अड्डे बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) व (२) गडहिंग्लज व नेसरी पोलीस ठाणे हद्दीत सन २०१५ व २०१६ मध्ये एकूण ४१ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ५५ आरोपींना अटक करून त्यांच्याकडून रुपये ४,३२,४५४/- इतक्या रक्कमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यासह इतर तालुक्यात पोलीसांची नजर चुकवून तसेच मोबाईलवरुन जुगार अथवा मटका सुरु असल्याचे निदर्शनास येताच तात्काळ छापा टाकून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

तसेच असे गुन्हे घडू नयेत म्हणून सशस्त्र पेट्रोलिंग व नाकाबंदी नेमून परिणामकारक कार्यवाही करणेबाबत सर्व पोलीस ठाण्यांना सूचना दिल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

**मौजे कोवाड (ता.चंदवड, जि.कोल्हापूर) येथील पोलीस दूरक्षेत्र इमारत व पोलीस कर्मचारी वसाहतीतील घरांची झालेली दुरवस्था**

**(८) ५७४१४ (२३-०८-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोवाड (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील पोलीस दूरक्षेत्र इमारत व पोलीस कर्मचारी वसाहतीमधील घरांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस दूरक्षेत्र इमारत व कर्मचारी वसाहतीतील घरांची दुरुस्ती तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१७) :**(१), (२) व (३) चंदगड पोलीस ठाणे अंतर्गत कोवाड दूरक्षेत्र येथील पोलीस कर्मचारी निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी दिनांक २५ नोव्हेंबर, २०१३

रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. ६.५४ लाख इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १४ मार्च, २०१४ रोजीच्या ज्ञापनाद्वारे रु. ४.५५ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. तथापि लोकसभा निवडणूक २०१४ आचारसंहिता कार्यक्रम दिनांक ०५ मार्च, २०१४ पासून लागू झाल्याने मंजूर काम १०० टक्के पूर्ण होणे शक्य नसल्याने सदरहू निधी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक विभाग, कोल्हापूर यांनी शासनाकडे समर्पित केला आहे.

पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांनी प्रस्तुत दुरुस्तीच्या कामांसाठी निधी मिळण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून शासनास सादर करण्यात येत आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तुत कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

---

**राज्यातील पोलीसांसाठी घरे बांधण्याबाबत**

**(९) ६१६५९ (२३-०८-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ दोन वर्षात पोलीसांसाठी राज्यात १५ ते २० हजार घरे बांधण्याचे काम सुरू करणार असून त्यासाठी चालु वर्षात १५०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर घरे निर्धारित वेळेत पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७) :**(१) व (२) राज्यात येत्या काही वर्षात पोलीसांसाठी १ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्याबाबतचे नियोजन पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत सुरु आहे. सद्य:स्थितीत प्रगतीपथावरील व नियोजनस्तरावरील कामासाठी सुमारे रु. ७६४२.०० कोटी इतका खर्च येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाटोदा (जि.बीड) येथे नवीन पोलीस ठाणे उभारण्याबाबत**

**(१०) ६२९३७ (२३-०८-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा (जि.बीड) येथे नवीन पोलीस ठाण्याची तातडीने उभारणी करण्याबाबतची मागणी मा. लोकप्रतिनिधी सातत्याने करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७) :**(१) होय.
(२) सदर विषयाबात क्षेत्रिय कार्यालय यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यासह मुंबई येथील गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरीत प्राधान्य देण्याबाबत**

**(११) ६२९५१ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यासह मुंबई येथील गिरण्यांच्या जागांचा व खाजगी उद्योगांच्या जागांचा विकास करून नव्याने उभारण्यात आलेल्या उद्योगांत तेथील कामगारांच्या मुलांना नोकरीत प्राधान्य देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;
(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०९-२०१७) :**(१) अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव कामगार विभागाकडे विचाराधीन नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेवगाव (जि.अहमदनगर) येथील पतसंस्थेने बनावट नोटा चलनात आणल्याबाबत**

**(१२) ६५४६४ (१७-०१-२०१७). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांगरे व शेवगाव (जि.अहमदनगर) येथील पतसंस्थेच्या जिल्ह्यासह राज्यातील ८ शाखामधील जमा केलेल्या बनावट नोटा नष्ट न करता चलनात आणल्या प्रकरणी पोलीसांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास दोषींना अटक केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बनावट नोटांची तस्करी करणा-या व्यक्तींकडे रुपये २ लाख ९ हजाराच्या बनावट नोटा आढळून आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरातील रहदारीच्या व वर्दळीच्या रस्त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे कार्यक्षमतेने बसविण्याबाबत**

**(१३) ६५५५७ (१३-०२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषतः मुंबई महानगरातील रहदारीच्या व वर्दळीच्या रस्त्यावर सी.सी.टी.व्ही. चे जाळे पूर्ण क्षमतेने व संख्येने विस्तारित करण्याकरिता आवश्यक त्या मनुष्यबळाची नियुक्ती करण्याबाबतची मागणी नागरिक संघटना, स्थानिक सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, राज्यातील विधिमंडळ सदस्यांनी तसेच राज्याचे मा.मुख्यमंत्री (गृह), मा.राज्यमंत्री (गृह-शहरे), मुख्यसचिव (महाराष्ट्र राज्य), प्रधान सचिव (गृह), व बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाचे संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदनकर्त्यांनी दिनांक २ ऑक्टोंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) मुंबई शहरात जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी मे. लार्सन अ‍ॅन्ड टुब्रो या कंपनीशी दि.७.२.२०१५ रोजी करार करण्यात आला आहे. त्यानुसार मुंबई शहरात एकुण ४७१७ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सदर करारानुसार संबधित कंपनीमार्फत या सर्व सीसीटीव्ही कॅमे-यांची देखभाल व दुरुस्ती करण्यात येणार आहे. सदर सर्व कॅमे-यांचे नियंत्रण पोलीस आयुक्त, मुंबई यांचे कार्यालयातील आदेश व नियंत्रण कक्ष व पोलीस वाहतुक मुख्यालय, वरळी, मुंबई येथील आदेश व नियंत्रण कक्ष अशा स्वतंत्र कक्षाव्दारे करण्यात येत आहे. तसेच सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाकरीता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची एकूण ४२ पदे सुधारीत आकृतीबंधात प्रस्तावित करण्यात आली आहेत.

---

**गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथील पोलीस वसाहत इमारतींची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१४) ६७१९१ (१७-०१-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गगनबावडा (जि.कोल्हापूर) येथील ४० वर्षापूर्वीच्या २८ इमारती मोडकळीस आल्या असून पोलिसांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस कर्मचाऱ्यांना नवीन पोलीस वसाहत बांधून देण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) कोल्हापूर जिल्ह्यातील गगणबावडा पोलीस स्टेशन येथील पोलीस कर्मचारी यांचेकरिता २८ नवीन निवासस्थाने बांधण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांनी सन २०१४ मध्ये प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्ताव हा अद्ययावत दरसूचीनुसार सादर करण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुस्लीम धर्म प्रचारक डॉ.झाकीर नाईक यांच्यावर कारवाई करण्याबाबत

**(१५) ६७४५४ (१७-०१-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुस्लीम धर्म प्रचारक डॉ. झाकीर नाईक यांच्या भाषणातून दहशतवाद्यांना शिकवण देत असल्याबाबतचा अहवाल मुंबई पोलिसांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालानुसार डॉ.झाकीर नाईक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने दिनांक १७.११.२०१६ च्या अधिसूचनेन्वये "इस्लामिक रिसर्च फाऊंडेशन" या दहशतवादी संघटनेवर बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंध अधिनियम, १९६७ अन्वये ५ वर्षाकरीता बंदी घातली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील पोलिसांना घरासाठी शासकीय कर्ज देण्याबाबत

**(१६) ६७९५४ (११-०१-२०१७). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पोलिसांना हक्कांच्या घरासाठी शासकीय कर्ज मिळण्याबाबत सुमारे आठ हजार अर्ज शासनाकडे पडून असल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण मंडळाने सदर कर्जे मंजूर करण्यासाठी शासनाकडे १६०० कोटी रुपये मागितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलिसांना हक्काचे घरकुल विकत घेता यावे यासाठी शासकीय कर्ज देण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण कल्याण महामंडळाकडून अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली नाही.
(३) राज्यातील पोलीस दलातील कर्मचारी यांना घरबांधणीसाठी बँकांमार्फत कर्ज व्यवस्था करण्याबाबत तसेच यासाठी घेण्यात येणा-या कर्जासाठी व्याजातील फरकाची रक्कम अदा करण्याबाबत दि.१०.०४.२०१७ रोजी निर्णय घेण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१७) ६८७२४ (११-०१-२०१७). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वैज्ञानिक सहायक आणि रासायनिक विश्लेषकांसह प्रयोगशाळा (सहायक) परिचरांच्या १४७ जणांना कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आली त्यातील ९८ पदे वैज्ञानिक सहायक आणि सहायक आणि सहायक रासायनिक विश्लेषकांची आहेत, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुरातील प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेतील उपसंचालक पद दोन वर्षापासून रिक्त असून १३३ पदांपैकी ३७ रासायनिक विश्लेषक आणि वैज्ञानिक विश्लेषकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रिक्त पदे कायमस्वरुपी भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०८-२०१७) :**(१) न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयामार्फत माहे मे, २०१६ ते जुन, २०१७ या कालावधीत सहायक रासायनिक विश्लेषकाची ४९ पदे, वैज्ञानिक सहायकाची ४९ पदे आणि प्रयोगशाळा परिचराची ४९ पदे अशी एकूण १४७ पदांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यात आली होती.

(२) व (३) सद्यस्थितीत प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नागपूर येथे पुर्णवेळ उपसंचालकाचे पद कार्यरत आहे. तसेच सदर प्रयोगशाळेमध्ये सद्यस्थितीत एकूण १६७ मंजूर पदे असून त्यापैकी सहायक रासायनिक विश्लेषकांची ३३ पदे मंजूर असून ९ भरलेली असून २४ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी काही पदे नवीन निर्माण केलेली असून, ही सर्व रिक्त पदे भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत कार्यवाही सुरु आहे. तसेच वैज्ञानिक सहायकाची मंजूर पदे २० असून १८ पदे भरलेली असून २ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदे भरण्याबाबत संचालनालयाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, विक्रोळी (प.) येथील पार्क साईट पोलिस ठाण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१८) ६८८८९ (११-०१-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, विक्रोळी (प.) येथील भाडे तत्वावर असलेले पार्क साईट पोलीस ठाण्यास मेफेअर टॉवर समोर, मोकळी जागा, रोड नं. १७ न.भू.क. २जी/ २एच (क्षेत्रफळ ७५९० चौ.मी.) किंवा हॉटेल टिम्बक टू समोरील न.भू.क.२ए/४सी (क्षेत्रफळ ३८६३३ चौ.फुट.) यापैकी एक जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पार्क साईट पोलिस ठाण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१७) :**(१) मेफेअर बिल्डींग समोर, रोड नं.१७, पार्कसाईट, विक्रोळी (प.) सर्व्हे क्र.१४२ हिस्सा क्र. १ हे १४७६.७ चौ.मी. क्षेत्र नियोजित मंडईसाठी राखीव असल्याने, सदर आरक्षणात बदल करुन उक्त जागा पार्क साईट पोलीस ठाण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४.१२.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना केली आहे.
(२) व (३) पार्क साईट पोलीस ठाण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेशी क्षेत्रीय स्तरावरुन पाठपुरावा सुरु आहे.

---

**अचलपूर (जि.अमरावती) येथे पोलीस अधीक्षक यांच्याकरिता**
**प्रशासकीय इमारत व ५६ निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(१९) ७१२८९ (१७-०१-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस अधीक्षक अमरावती करिता अचलपूर जिल्हा अमरावती येथे पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत व ५६ निवासस्थाने बांधण्याबाबत लोकप्रतिनिधी, अचलपूर यांनी दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी सचिव, गृह विभाग यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी अपर पोलीस महासंचालक व सह व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ यांच्या पत्रानुसार सदर कामांची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१७) :**(१), (२) व (३) अचलपूर जि.अमरावती येथील पोलीस स्टेशन व ५६ निवासस्थाने बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रसिध्द करण्यात आलेली असून कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देऊळगावमही (जि.बुलढाणा) येथील पोलीस चौकीमधील रिक्त पदांबाबत**

**(२०) ७२४९६ (११-०१-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देऊळगावराजा पोलीस स्टेशनअंतर्गत (जि.बुलढाणा) देऊळगाव मही पोलीस चौकीच्या कार्यकक्षेत ११ गावे असून तेथील कारभार केवळ ७ पोलीसांवर अवलंबून असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस चौकीमध्ये अपुरे कर्मचारी असण्याची कारणे काय असून उक्त पोलीस चौकीत आवश्यक तो कर्मचारी वर्ग नेमण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०१७) :**(१) व (२) देऊळगाव मही पोलीस दुरक्षेत्र हे देऊळगाव राजा पोलीस ठाणे अंतर्गत येत असून सदर पोलीस ठाण्याकरीता ३ पोलीस अधिकारी व ६४ पोलीस कर्मचारी याप्रमाणे एकुण ६७ पदे मंजूर आहेत. देऊळगाव मही पोलीस दुरक्षेत्राकरीता १ पोलीस हवालदार व २ पोलीस शिपाई अशी ३ पदे मंजूर आहेत. तथापि सदर दुरक्षेत्राकरीता १ सहायक पोलीस उपनिरीक्षक, २ पोलीस हवालदार व ४ पोलीस शिपाई यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांनी देऊळगाव राजा पोलीस ठाण्याचे विभाजन करुन देऊळगाव मही दुरक्षेत्र येथे नवीन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केला होता. सदर प्रस्ताव अपुर्ण असल्याने पोलीस महासंचालक यांनी प्रस्तुत प्रकरणी सविस्तर माहितीसह सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांना निदेश दिलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील VRL कंपनीचे पावणे दोन कोटी रुपये जप्त करण्यात आल्याबाबत**

**(२१) ७३०९३ (१६-०१-२०१७). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथील दाभोळकर कॉर्नर येथील VRL कंपनीच्या हवालाचे पावणे दोन कोटी रुपये जप्त केल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) व (२) व्हीआरएल कंपनीचे पैसे जप्त केले नसून दि.२३/०९/२०१६ रोजी पृथ्वी एंटरप्रायईज कुरियर कंपनी अहमदाबाद, एस.शैलेशकुमार ॲन्ड कुरियर कंपनी अहमदाबाद व मेसर्स राजेशकुमार ॲन्ड कुरियर कंपनी अहमदाबाद यांचे रोख रुपये १,६७,१०,०००/- जप्त करण्यात आले होते. सदर प्रकरणी आरोपीतांना सीआरपीसी कलम ४१ (१) (ड) प्रमाणे अटक करुन मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट कोल्हापूर येथे हजर करण्यात आले होते.
सदर रक्कमेची चौकशी होण्यासंदर्भात सहायक आयकर निर्देशक (अन्वेषण), कोल्हापूर यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. सदरची रोख रक्कम परत मिळणेबाबत संबंधित कुरीयर कंपनीने मा.न्यायालयात किरकोळ अर्ज केला होता. त्याप्रमाणे मा.न्यायालयाने खातरजमा करुन संबंधित कुरियर कंपनीस रक्कम देण्याबाबत आदेश दिले होते. त्याप्रमाणे सदरची रक्कम संबंधितांना परत देण्यात आली आहे.
(३) विलंब झाला नाही.

---

**राज्यातील जल वाहतूक सक्षम करण्याबाबत**

**(२२) ७३८०७ (२०-०४-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील जल वाहतूक सागरमाला योजनेनुसार सक्षम करण्याची सूचना केंद्रीय जलवाहतूक मंत्र्यांनी घोषीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर वाहतूक करणाऱ्या बोटींपैकी ९० टक्के बोटी कालबाह्य झाल्याची माहिती समोर आली असल्याने सागरमाला योजना यशस्वी होण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सागरमाला योजना यशस्वी होण्यासाठी अत्याधुनिक बोटी आणि सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सागरमाला अंतर्गत प्रवासी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून एकूण १९ प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आले असून, त्यापैकी १० प्रस्तावास मंजूरी मिळाली व त्यासाठी रु.६१.७१ निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच सागरमाला कार्यक्रमांतर्गत अत्याधुनिक बोटी खरेदीबाबत निधी उपलब्ध करुन देण्याची कोणतीही योजना नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील सुमारे चारशे सेवा निवृत्त नागरिकांचे आठ महिन्यांपासून पेन्शन जमा न झाल्याबाबत**

**(२३) ७४०२६ (१५-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील शाहुवाडी बँक ऑफ इंडिया शाखेत सुमारे चारशे सेवा निवृत्त नागरिकांचे आठ महिन्यांपासून पेन्शन जमा झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पी.पी.ओ नंबर नसल्याने भविष्यनिर्वाह निधी कार्यालयाकडून पेन्शन जमा होत नसल्याचे बँकेकडून सांगितले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व तद्नुसार निवृत्त नागरिकांची पेन्शन जमा होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०८-२०१७)** :(१) हे खरे नाही.

कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या कोल्हापूर येथील क्षेत्रिय कार्यालयाने आधार संलग्न जिवन प्रमाण (केंद्र शासनाच्या अधिसुचनेनुसार अनिवार्य) सादर केलेल्या ६७४ निवृत्तीवेतन धारकांचे एप्रिल,२०१७ पर्यंतचे निवृत्तीवेतन संबंधित बँकेत जमा केले आहे. तर माहे मे,२०१७ मध्ये अशा २०० निवृत्तीवेतन धारकांचे निवृत्तीवेतन संबंधित बँकेत जमा केले आहे.

निवृत्तीवेतन धारकांना विना खंड निवृत्तीवेतन देता यावे या करीता डिजिटल जिवन प्रमाण सादर करण्याबाबत सदर कार्यालयाने वर्तमान पत्राव्दारे व्यापक प्रसिध्दी दिली आहे. डिजिटल जिवन प्रमाण सादर करण्याची अंतिम मुदत जानेवारी, फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल,२०१७ पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आली होती.
(२) हे खरे नाही.

ज्या निवृत्तीवेतन धारकांनी डिजिटल जिवन प्रमाण सादर केले नव्हते केवळ अशा निवृत्तीवेतन धारकांना निवृत्तीवेतन अदा करण्यात आले नाही. पी.पी.ओ नंबरशी याचा कोणताही संबंध नाही.

(३) माहे नोव्हेंबर, २०१६ पासून डिजिटल जिवन प्रमाणाची नोंदणी करण्याची सुविधा भविष्य निधी कार्यालय, क्षेत्रिय कार्यालय, कोल्हापूर येथे उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त सदर सुविधा महा ई सुविधा केंद्र आणि सर्व जिल्ह्यातील ग्राहक सेवा केंद्रात उपलब्ध आहे. तसेच, निवृत्तीवेतन अदा करणाऱ्या बँकांना देखील सदर सुविधा पुरविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील देवस्थानची जागा विश्वस्तांनी परवानगी न घेता विक्री केल्याबाबत**

**(२४) ७५२५२ (२०-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील श्री मारुती देवस्थान, श्री विठ्ठल रुक्मीणी देवस्थान, श्री ज्योतिर्लिंग देवस्थान तसेच श्री लक्ष्मी नारायण देवस्थानाच्या विश्वस्तांनी (पुजारी) देवस्थानांच्या जागेवर प्लॉटिंग करुन तसेच लातूर येथील धर्मादाय आयुक्त कार्यालयाची परवानगी न घेता जागा विकल्याची बाब माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) अ) श्री मारुती देवस्थान, टेंभुर्णी या देवस्थानच्या अभिलेख्यावर टेंभुर्णी येथील गट क्र.१०९१ क्षेत्र ६.१५ आर ही जमीन आहे. या शेत जमीनीवर सर्व साधारण कुळ म्हणून, श्री दत्तात्रय माणिक देवकर यांचा ताबा असून, ही जमिन ते त्यांच्या वाड वडीलांपासून कसत आहेत. या जमिनीवर कोणतीही प्लॉटिंग करुन विक्री झालेली नाही.

ब) श्री विठ्ठल रुक्मीणी देवस्थान, टेंभुर्णी या नावाचा न्यास धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे नोंदविण्यात आलेला नाही. तथापि, श्री विठ्ठल मंदिर, टेंभुर्णी या नावाचा न्यास ए-५२३, सोलापूर या क्रमांकाने नोंदविण्यात आलेला आहे. या न्यासाच्या रेकॉर्डवर सर्व्हे नं. ५९० क्षेत्र ५ एकर १२ गुंठे जमीन व त्याच सर्व्हे नंबरात २० x१२ फुटाचे देऊळ आहे. या जमिनीस नविन गट नं. २१ पडलेला असून क्षेत्र २ हेक्टर ५६ आर आहे. या क्षेत्रापैकी २ हेक्टर

४० आर जमीन ही धर्मादाय सह आयूक्त लातूर यांचे चौकशी क्रमांक ५/२००३ कलम ३१(१) (अ) मधील आदेश दिनांक २८/५/२००३ नूसार रितसर परवानगी घेऊन ऋषिकेश राजेंद्र गोसावी, रा अकलूज, ता.माळशिरस यांना शेतजमीन म्हणून सन २००३ मध्ये विक्री केलेली आहे. उर्वरित १६ गुंठे जमीन ही देवस्थानच्या ताब्यात असून त्याचे प्लॉटींग करुन अथवा अन्य कोणत्याही प्रकारे विक्री केलेली नाही.

क) श्री ज्योर्तिलिंग देवस्थान, टेंभूर्णी हा न्यास धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे नोंदविण्यात आलेला नाही. यास्तव या देवस्थानास जमीन आहे किंवा कसे अथवा असल्यास ती विश्वस्तांनी प्लॉटींग करुन धर्मादाय आयुक्तांनी परवानगी न घेता विक्री केली आहे किंवा कसे याबाबतचा अभिलेख धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे उपलब्ध नाही.

ड) श्री लक्ष्मी नारायण देवस्थान, टेंभूर्णी हा न्यास ए - १२१०, सोलापूर या क्रमांकाने नोंदणीकृत असून या न्यासाची नोंदणी अर्जानूसार टेंभूर्णी येथील गट नं. ८७१ क्षेत्र येथे १० हेक्टर ३४ आर इतकी जमीन आहे. या पैकी ८ हेक्टर जमीन मा. धर्मादाय सह आयुक्त, लातूर यांचे चौकशी क्र. २/२००२ कलम ३६(१) (अ) मधील मंजूरी आदेश दि. २५/०१/२००२ नूसार रितसर परवानगी घेऊन विश्वस्तांनी सदर आदेशात नमुद तीन व्यक्तींना विक्री केलेली आहे. सदर आदेशान्वये विक्री केलेली जमीन ही शेतजमीन म्हणून विक्री केलेली आहे. तसेच महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश दिनांक १७/७/२००७ आणि तहसिलदार, माढा, यांच्या आदेश दि १७/७/२००८ नूसार विक्री केलेल्या जमीनीचा इनाम वर्ग-३ मधून कमी करण्यात आलेली आहे. धर्मादाय सह आयूक्त, लातूर यांच्या वरील प्रमाणे आदेशानुसार विक्री करुन उर्वरित राहिलेली शेत जमीन ६ एकर २४ गुंठे जमीन ही सध्या न्यासाच्या ताब्यात आहे व त्यास तारेचे कुंपण घातलेले आहे

(२) अ) श्री विठ्ठल मंदिर, टेंभूर्णी, न्यास नोंदणी क्र.ए - ५२३, सोलापूर आणि श्री लक्ष्मीनारायण देवस्थान, टेंभूर्णी न्यास नोंदणी क्र. ए १२१०, सोलापूर या दोन न्यासांनी धर्मादाय सह आयूक्त, लातूर यांच्या परवानग्या घेऊन शेतजमीनी विक्री केलेल्या आहेत. तर श्री विठ्ठल मंदिर, टेंभूर्णी ह्या न्यासाची जमीन सर्वसाधारण कुळ असलेले दत्तात्रय माणिक देवकर यांच्या ताब्यात आहे आणि ज्योतिर्लिंग देवस्थान हे धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाकडे नोंद नाही.

ब) सदर जमिनीच्या विक्रीबाबत नागरिकांनी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्याचे दिसून येत नाही.

(३) धर्मादाय आयुक्त यांच्याकडे तक्रारी दाखल करण्यात आलेल्या नाहीत तसेच श्री विठ्ठल मंदिर, टेंभूर्णी, न्यास नोंदणी क्र. ए-५२३, सोलापूर आणि श्री लक्ष्मीनारायण देवस्थान टेभूर्णी न्यास नोंदणी क्र. ए -१२१०, सोलापूर या दोन ट्रस्टनी रितसर परवानगी घेऊनच जमीनी विक्री केल्या आहेत. उर्वरित न्यास, मारुती देवस्थानने कोणतीही जमीन विक्री केलेली नाही व ज्योतिर्लिंग देवस्थानची नोंद धर्मादाय आयुक्त यांच्याकडे झालेली नाही. यास्तव सदर प्रकरणी चौकशी करण्याचा वा संबंधीतांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**माडगी (ता.तुमसर जि.भंडारा) येथील क्लैरीयन ड्रग्ज कारखान्यातील कामगारांच्या मागण्यांबाबत**

**(२५) ७५४३८ (२१-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माडगी (ता.तुमसर, जि.भंडारा) येथील क्लैरीयन ड्रग्ज कारखान्यातील कामगारांना किमान वेतन, बोनस, सुट्टया, सुरक्षा साहित्य, वैद्यकीय सुविधा इ. मिळत नसून शुध्द पिण्याचे पाणी उपलब्ध नसणे व मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे एका कामगाराचा मृत्यू झाल्याने दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी कामगारांनी कामबंद करण्याचे निवेदन शासनाला दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या निवेदनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०७-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

तथापि, सहायक कामगार आयुक्त, भंडारा कार्यालयाने सदर कारखान्यात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय मजदूर मंच या संघटनेच्या अध्यक्षांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून माहिती घेतली असता, संघटनेने दिनांक ५.११.२०१६ रोजी संचालक क्लैरीयन ऑर्गनिक्स लि. तुमसर यांना कामगारांच्या ज्वलंत प्रश्नांबाबत निवेदन दिले आहे. सदर निवेदनाची प्रत सहायक कामगार आयुक्त, भंडारा कार्यालयाने दिनांक ६.३.२०१७ रोजी प्राप्त करुन घेतली. तथापि, दिनांक १९.११.२०१६ रोजी वा तद्नंतर सुध्दा कारखान्यात कोणतेही कामबंद आंदोलन संघटनेमार्फत करण्यात आलेले नाही.

(२) संघटनेच्या निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने, सरकारी कामगार अधिकारी, तुमसर, जि.भंडारा यांनी कारखान्यास भेट देऊन किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६ व बोनस प्रदान अधिनियम, १९६५ अंतर्गत निरिक्षण केले असता कामगारांना किमान वेतन दरानुसार वेतन तसेच नियमानुसार बोनस मिळत असल्याचे आढळून आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या जी-उत्तर विभागाचे वरिष्ठ वसाहत अधिकारी हे बनावट कागदपत्रांच्या आधारे फोटोपास देत असल्याबाबत**

**(२६) ७५४६९ (२१-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या जी-उत्तर विभागाचे वरिष्ठ वसाहत अधिकारी श्री.अशोक दत्तात्रय कोकाटे, वसाहत अधिकारी श्री.सुशिलकुमार गांगुर्डे हे बोगस कागदपत्रांच्या आधारे फोटोपास देत असल्याप्रकरणी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी सहायक पोलीस निरिक्षक यांच्यामार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय व त्यानुषंगाने वरिष्ठ वसाहत अधिकारी व वसाहत अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रार अर्जावर चौकशी करुन शिवाजी पार्क पोलीस ठाणे येथे गु.र.क्र ९८/१७ भा.दं.वि.स.कलम ४२०,४६६,४६८,४७१,३४ सह चार आरोपी विरुध्द दि.३०.३.२०१७ गुन्हा दाखल करण्यात आला. सदर प्रकरण तपासाधीन आहे.
(२) सदर गुन्ह्यातील अर्जदाराने नमूद केलेले वरिष्ठ वसाहत अधिकारी व वसाहत अधिकारी यांचा गुन्ह्यातील सहभाग अद्यापपर्यंत केलेल्या तपासावरुन निष्पन्न होत नसल्याने त्यांचेविरुध्द कारवाई झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद (जि. औरंगाबाद) शहरालगत असणाऱ्या परिसरातील शेतजमीन बाजारभावा पेक्षा कमी किंमतीत खरेदी करून देण्याचे आमिष दाखवून साडे नऊ कोटी रुपयांची करण्यात आलेली फसवणूक**

**(२७) ७५५११ (२१-०४-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरालगत असणाऱ्या परिसरातील शेतजमीन बाजारभावा पेक्षा कमी किंमतीत खरेदी करून देण्याचे आमिष दाखवून व खोट्या खरेदी खताद्वारे एका इसमाने साडे नऊ कोटी रुपयांची फसवणूक केली असून औरंगाबाद सिटी चौक पोलीस ठाण्यात दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी सिटीचौक पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे १० आरोपींविरुध्द गु.र.नं.५१९/२०१६ भा.दं.वि कलम ४०३, ४०९, ४२०, ४२३, ४६७, ४६८, ४७१, ५०४, ५०६, १२०(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) सदर गुन्ह्याच्या तपासात आरोपींनी कटकारस्थान रचुन फिर्यादी यांचे एकूण ९,७५,००,०००/- रुपयांची फसवणूक केली असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यातील आरोपींना मा. उच्च न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. गुन्ह्यातील आरोपीतांविरुध्द अधिक पुरावा हस्तगत करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याच्या अनुषंगाने गुन्ह्याचा तपास चालू आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## मुळशी (जि.पुणे) तालुक्याचा राज्यात इंटरनेटद्वारे ग्रामपंचायती जोडण्याच्या पथदर्शी कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आला असल्याबाबत

**(२८) ७५८६७ (२१-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्याचा राज्यात इंटरनेटद्वारे ग्रामपंचायती जोडण्याच्या पथदर्शी कार्यक्रमामध्ये समावेश करण्यात आला असल्याची माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव यांनी मुळशी येथे आयोजित बैठकीत दिली असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी वीज वितरण प्रणालीतील सर्व खांबाचे जीओ-टॅगिंग करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनाने ॲपची निर्मिती करण्याबरोबरच संगणकीय प्रणाली निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०८-२०१७) :**(१) होय.

(२) अंशतः खरे, मुळशी तालुक्यातील निवडक ग्रामपंचायती भारत नेट अंतर्गत पहिल्या टप्प्यात जोडण्यात येणार आहे. याकरीता वीज वितरण प्रणालीतील खांबांचे निवडलेल्या ग्रामंपचायती पर्यंतचे जाणारे जीओ-टॅगीग करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

(३) वीज वितरण खांबांचे जीओ-टॅगीग करीता शासनाने विशेष ॲप तयार केले असून त्यामार्फत जीओ-टॅगीग करण्यात आले आहे.

(४) संबंधीत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील शेतक-यांची कापूस खरेदीत कापूस व्यापा-याने केलेली फसवणूक

**(२९) ७६२२४ (२१-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतक-यांकडून वाढीव दराने उधारीवर कापूस खरेदी करुन हकमोद्दीन नावाचा कापूस व्यापा-याने शेतक-यांना फसविल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मांडवी पोलिसांत सदर इसमा विरुध्द फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे काय, तसेच त्याचेवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, मांडवी जि.नांदेड येथे गु.र.नं. ०६/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करणयात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपीचा शोध घेण्यात येत असून इतर २ सह आरोपीस मा. अपर सत्र न्यायाधिश ४ नांदेड यांनी अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**बनपिंपरी शिवारा (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे दरोडेखोरांनी वृध्द जोडप्यास मारहाण केल्याबाबत**

**(३०) ७६६३० (२०-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनपिंपरी शिवारा (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथे दरोडेखोरांनी वृध्द जोडप्यास मारहाण करुन ५ हजार रुपये व सोन्याचे दागिने घेऊन पलायन केल्याची घटना दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर दरोडेखोरांचा तपास करुन दरोड्यात चोरुन नेलेल्या सोन्याचा दस्तऐवज व रोख रक्कम हस्तगत करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७)** :(१) होय, परंतू सदरची घटना दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी घडली असून, त्यामध्ये एकुण रुपये ३६०००/- किंमतीच्या मुद्देमालाची चोरी झालेली आहे.

(२) सदर प्रकरणी श्रीगोंदा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५६९/२०१६ भा.दं.वि. कलम ३९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात चोरीला गेलेल्या मुद्देमालाची व गुन्हेगारांची वेळोवेळी माहिती काढण्याचा प्रयत्न केला असून, स्थानिक गुन्हेगारांच्या व अशा प्रकारे गुन्हे करणारे गुन्हेगार यांच्या घरझडत्या घेण्यात आल्या आहेत. तसेच श्वानपथकाचा वापर करण्यात आला असून, चोरटयांचे स्केच बनवून जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला तपासासाठी पाठविण्यात आले आहे. तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**देवस्थानांचा कारभार पाहणाऱ्या जिल्हा व सत्र न्यायधिश यांना माहितीचा अधिकार कायदा लागू करण्याबाबत**

**(३१) ७७०३६ (२१-०४-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहूर (जि.नांदेड) येथील श्री रेणुकादेवी संस्थान, श्रीक्षेत्र माहूरगड येथे विविध पदांवर जिल्हा न्यायाधीश, तहसिलदार, पोलीस अधिकारी आणि अन्य शासकीय अधिकारी असतांनाही केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम, २००५ कायद्याखाली माहिती विचारली असता माहिती अधिकार सदर संस्थांना लागू होत नाही अशी माहिती अधीक्षक, श्री रेणुकादेवी संस्थान, माहूर यांनी दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यादरम्यान दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत हिंदू विधीज्ञ परिषद आणि हिंदु जनजागृती समिती तसेच मा.आदिवासी विकासमंत्री, महाराष्ट्र यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्र लिहून कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्यानुसार माहूर येथील श्री रेणुकामाता मंदिर, महाबळेश्वर येथील श्रीक्षेत्र महाबळेश्वर मंदिर, त्र्यंबकेश्वर येथील श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर अशा सर्वच देवस्थानांना माहितीचा अधिकार अधिनियम लागू करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे तसेच अतिरिक्त कार्यभार पाहणाऱ्या जिल्हा आणि सत्र न्यायाधीश यांना काही मार्गदर्शक तत्त्वे अथवा नियम घालून देण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७) :**(१) माहूर (जिल्हा नांदेड) येथील श्री रेणूकादेवी संस्थान, श्री क्षेत्र माहूरगड यांनी न्यासाला शासकीय अनुदान मिळत नसल्याने माहिती अधिकार कायदा लागू होत नसल्याचे संबंधित अर्जदारांना दि.१५.०४.२०१५ वा त्या दरम्यान कळविले आहे. या पृष्ठर्थ मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई यांनी दि. ०९.११.२०१६ रोजी श्री. बच्चु शिवाजी भोसले विरुध्द जन माहिती अधिकारी या दरम्यान अपिल क्र. बीएम १९६९/२०१६ मध्ये निकाली काढलेल्या आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे रिट पिटीशन क्र. ५२९४/ २००८ मधील दि.२८.०४.२००९ रोजीची प्रत सोबत जोडली आहे. सदर दोन्ही निकालपत्रांमध्ये ज्या धर्मादाय न्यासांना शासनाचे भरीव अर्थसहाय्य मिळत नाही त्या संस्थांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असे आदेशीत करण्यात आले आहे.

(२) सदर विषयाबाबत हिंदू विधीज्ञ परिषद यांचे विधि व न्याय विभागास अग्रेषित केलेले दि.२३.०३.२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीस अनुसरुन सर्व देवस्थानांना सूचित करण्याबाबत धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना विभागाच्या दि.३०.०५.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आदेशित करण्यात आले आहे.

(३) माहूर येथील श्री रेणुकामाता मंदिर, महाबळेश्वर येथील श्री क्षेत्र महाबळेश्वर मंदिर तसेच श्री त्र्यंबकेश्वर महादेव मंदिर, त्र्यंबकेश्वर यांच्यावर धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून नियंत्रण ठेवले जाते. यास्तव सर्व संबंधित देवस्थानांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करण्यात आलेल्या तरतूदीनुषंगाने उचित कार्यवाही करण्याची सूचना देण्याबाबत धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना आदेशित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंबई येथे वरळी सी लिंक, विक्रोळी पुर्व, द्रुतगती मार्ग, पेडर रोड, वांद्रे रिक्लेमेशन सेंटर येथील रस्त्यांवर मध्यरात्रीच्या वेळी दुचाकी वाहन शर्यतीचे आयोजन केले जात असल्याबाबत**

**(३२) ७७९९६ (२१-०४-२०१७). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई येथे वरळी सी लिंक, विक्रोळी पुर्व, द्रुतगती मार्ग, पेडर रोड, वांद्रे रिक्लेमेशन सेंटर येथील रस्त्यांवर मध्यरात्रीच्या वेळी दुचाकी वाहन शर्यतीचे आयोजन केले जात असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुचाकी वाहन शर्यतीचे आयोजन हिंदी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्ती, राजकीय नेते आणि बड्या मोबाईल कंपन्यांचे मालक अवैधरित्या करत असून दुचाकी वाहन शर्यतीचे कोट्यवधी रुपयांचा सट्टाही लावण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती अवैधरित्या बाइक रेसिंगचे आयोजन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०९-२०१७) :**(१)बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सन २०१७ मध्ये "बाईक रेसिंग" बाबत बांद्रा पोलीस ठाणे येथे २ व विक्रोळी पोलीस ठाणे येथे ४ गुन्हयांची नोदं करण्यात आली असून अनुक्रमे: १८ व ३६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. नमूद गुन्ह्यापैकी विक्रोळी पोलीस ठाणे नमूद गुन्हा क्र. १३४/२०१७, हा न्यायप्रविष्ठ असून उर्वरित प्रकरणे तपासाधिन आहेत.
(२) व (३) गुन्ह्याच्या तपासात सट्टा लावण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
नमूद ठिकाणी बाईक रेसिंगचे आयोजन करत असल्याबाबत निदर्शनास आलेले नाही. तथापि, नोव्हेंबर, २०१६ पासून बांद्रा सि-लिंक व बांद्रा रिक्लेमेशन या ठिकाणी सि-लिंकला जोडणाऱ्या हायवे वरील साउथ बॉड व नॉर्थ बॉड येथे पोलीस वाहनासह व्हिडीओ शुटींगसहीत योग्य तो बंदोबस्त नियमित लावण्यात येत आहे. तसेच सदर ठिकाणी पोलीस वाहनांची गस्त वाढविण्यात आलेली आहे
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट मिळण्याबाबत**

**(३३) ७८०२३ (२०-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी नक्षलग्रस्त कारवायांचा मुकाबला करण्यासाठी हलक्या वजनाचे नवीन पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट मिळण्यासाठी पाठविलेला प्रस्ताव माहे जानेवारी, २०१७ पर्यंत शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्याची प्रक्रिया गत अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नक्षलग्रस्त भागासाठी तसेच मुंबई पोलिसांसाठी अत्याधुनिक पध्दतीचे बुलेटप्रुफ जॅकेट पुरविण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०१७) :**(१) पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर यांचेकडून बुलेटप्रुफ जॅकेट उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव दि.१३.४.२०१६ रोजी पोलीस महासंचालक कार्यालयास पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने व इतर पोलीस घटकांकडील मागणी विचारात घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून एकूण ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदीबाबतचे आदेश पुरवठादारास देण्यात आलेले आहेत.

(२) व (३) मुंबई पोलीसांसाठी सन २०१०-११ मध्ये ५४४ नग बुलेटप्रुफ जॅकेट यापूर्वीच पुरविण्यात आलेले आहेत. राज्यातील नक्षलग्रस्त भागासह सर्व पोलीस दलासाठी एकत्रित ५००० नग बुलेटप्रुफ जॅकेट खरेदी करण्याचा पोलीस महासंचालक स्तरावरील खरेदी समितीने निर्णय घेतला असून, माहे एप्रिल, २०१७ मध्ये पुरवठादारास तात्काळ पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीरारोड येथील बांधकाम व्यावसायिक अग्रवाल यांनी सरकारच्या युएलसी कायद्यांतर्गत सरकारच्या जमिनी घेऊन अपहार केल्याबाबत**

**(३४) ७८६११ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कोट्यवधी रुपयांच्या युएलसी घोटाळ्याप्रकरणी पोलिसांनी मीरा रोड येथील विकासक श्यामसुंदर अग्रवाल यांच्या सह ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील खाजगी हस्तक श्री बबन पारकर यांना ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली व विकासकांना मदत करणाऱ्या वास्तुविशारद यांची चौकशी केल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती किती कोटी रुपयांचा युएलसी गैरव्यवहार निदर्शनास आला त्यामध्ये किती विकासक व किती वास्तुविशारद व इतर अधिकारी असल्याचे निदशर्नास आले तद् नुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर याबाबत ठाणे नगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.२०१/२०१६ भादंवि कलम ४२०, ४६७, ४६८, ४७०, ४७१, १२० (ब) सह भ्र.प्र.का. कलम १३ (१) (ड) प्रमाणे ६ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल आहे. या गुन्हयाचा तपासात सुमारे १०२,१९,८२,६००/-इतक्या रकमेचे शासनाच्या महसुलाचे नुकसान झाल्याचे निष्पन्न झाले आहे. नमुद गुन्हयातील ५ अटक आरोपी व १ मयत आरोपी यांचेविरुद्ध मा. विशेष न्यायालय, ठाणे येथे दि.३१.०३.२०१७ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील संभाजी उद्यानातील नाटककार राम गणेश गडकरी यांच्या पुतळ्याची जातीयवाद्यांनी तोडफोड केल्याबाबत

**(३५) ७८९८३ (२१-०४-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रदीप नाईक (किनवट), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील जंगली महाराज रोडवरील छत्रपती संभाजी उद्यानामधील ख्यातनाम नाटककार राम गणेश गडकरी यांचा महापालिकेने बसविलेला पुतळा विकृत जातीयवादयांनी तोडफोड करुन नदीत फेकून दिल्याची घटना दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर विकृत जातीयवाद्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच पुतळा पुन्हा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी डेक्कन पोलीस ठाणे, पुणे येथे गु. र. क्र. ०१/१७ भादवि कलम १२० ब, १५३ (अ), ३७९, ४२७, ४४७, सार्वजनिक मालमत्ता हानी प्रतिबंधक कायदा १९८४ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या सर्व अटक आरोपी जामिनावर मुक्त आहेत. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडून मुंबई, ठाणे आणि पालघर येथे जलक्रिडा प्रकल्प राबविण्यात येणार असल्याबाबत

**(३६) ७९१७५ (२१-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील समुद्र किना-यावर जलक्रिडा प्रकल्प महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाकडून मुंबई, ठाणे आणि पालघर येथे राबविण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे समुद्र किना-यावर पर्यटकांना कायकिंग, पॅारासेलिंग आणि वॅाटर स्वींइगसारख्या क्रीडा प्रकारांचा आनंद घेता येणार असून सदर प्रकल्प राज्यातील समुद्र किना-यावर असणा-या सर्व जिल्ह्यांत राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०८-२०१७) :**(१) व (२) होय.
(३) जिल्हानिहाय खाली नमूद केल्यानुसार प्रकल्पधारकांना इरादा पत्र (Letter of Intent) देण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | इरादा पत्र देण्यात आलेल्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | पालघर | ६ |
| २ | ठाणे | ८ |
| ३ | मुंबई व मुंबई उपनगर | १७ |
| ४ | रायगड | १३ |
| ५ | रत्नागिरी | ३ |
| ६ | सिंधुदूर्ग | १६ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी येथील मोहाटादेवी देवस्थानाने तब्बल दोन किलो सोन्याची 'सुवर्णयंत्रे' बनवून मुर्तीखाली पुरल्याबाबत

**(३७) ७९४६४ (१८-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) येथील मोहाटादेवी देवस्थानाने तब्बल दोन किलो सोन्याची 'सुवर्णयंत्रे' बनवून ती मुर्तीखाली पुरल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यरन निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू यंत्राची निव्वळ मजूरी व त्यावरील मंत्रोच्चारासाठी २५ लाखांचा अफाट खर्च केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त सर्व प्रकाराची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

सन २०१०-२०११ मध्ये ९१ सुवर्ण यंत्रे तयार करुन घेण्यात आली असून सोन्याचे वजन अंदाजे १८५७.९५० ग्रॅम इतके आहे.

(२) होय, हे खरे आहे.

या यंत्राची निव्वळ मजूरी व त्यावरील मंत्रोच्चारासाठी रु. २४,८५,०००/- खर्च दाखविण्यात आला आहे.

(३) याबाबत, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.४१/१४ न्यायप्रविष्ठ आहे. तसेच,सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर यांच्याद्वारे क्र.४९/१४ अन्वये चौकशी करण्यात येत असून सदर निरीक्षक चौकशी प्रलंबित आहे.

(४) याबाबत, मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.४१/१४ न्यायप्रविष्ठ असल्यामुळे विश्वस्तांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. यास्तव सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहमदनगर येथील निरीक्षक चौकशी क्र.४९/१४ प्रलंबित आहे. धर्मादाय उप आयुक्त, अहमदनगर यांच्याकडील चौकशीबाबतचे प्रकरण दि.२७.०७.२०१७ रोजी पुढील आदेशाकरीता ठेवण्यात आले आहे.

---

## राज्यातील हस्ताक्षर तज्ञांचा समावेश सेवाभरती नियमांमध्ये करण्याबाबत

**(३८) ७९५११ (२१-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध गुन्हयांचा तपास सर्व मार्गांनी व खोलवर जाऊन व्हावा यासाठी शासनाने फोरेन्सिक सायन्स ही संस्था सन २००९ साली सुरु केली व त्या संस्थेतून गत काही वर्षात अनेक विद्यार्थी पदवी घेऊन बाहेर पडले आहेत परंतू शासनाने या सर्वांचा समावेश सेवाभरती नियमांमध्ये न केल्यामुळे त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या हस्ताक्षर तज्ञांचा समावेश सेवाभरती नियमांमध्ये करण्याचा प्रस्ताव सी.आय.डी. पुणे यांनी शासनास सादर केला असून तो गृह विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०९-२०१७)** :(१) गृह विभागाच्या दि. २८.४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील सहायक रासायनिक विश्लेषक, गट-ब या पदासाठी न्यायसहायक विज्ञान या विषयातील पदव्युत्तर पदवी व वैज्ञानिक सहायक, गट-क या पदांसाठी न्यायसहायक विज्ञान या विषयातील पदवी ही समकक्ष म्हणून घोषित केलेली आहे;
(२) व (३) राज्य गुन्हे अन्वेषण विभागांतर्गत कार्यरत हस्ताक्षर तज्ञ विभागातील व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील विविध पदांच्या सेवा प्रवेश नियमात न्यायसहायक विज्ञान या विषयातील पदवीचा समावेश करून सुधारित सेवाप्रवेश नियम तयार करण्याची बाब सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने शासन स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे नेवासा (जि. अहमदनगर) येथील तालुका मुख्यालयातील पोलीस कर्मचारी संख्याबळ वाढवून मिळणे तसेच पोलीस उपविभागीय कार्यालयाच्या मागणीबाबत**

**(३९) ७९५१२ (२१-०४-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नेवासा (जि अहमदनगर) पोलीस स्टेशनच्या हद्दीत ९७ ग्राम पंचायती, एक नगर पंचायत तसेच वाड्या वस्त्या पकडून सुमारे ११५ गावांचा समावेश होत असून कामाच्या दृष्टीने सदर पोलीस स्टेशनच्या ५ बिट्स आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस स्टेशनचे हद्दीत असलेल्या सुमारे ४० कि.मी. च्या राष्ट्रीय महामार्गावर कायम अपघात होत असून तेथे नियंत्रण ठेवण्यासाठी फक्त १ पोलीस निरीक्षक, एक उप निरीक्षक, ६५ पोलीस शिपाई तसेच एकच वाहन उपलब्ध असून उक्त संख्याबळ वाढवून मिळणे तसेच पोलीस उपविभागीय कार्यालयाच्या मागणी स्थानिक नागरिक व पदाधिकाऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१७)** :(१) नेवासा पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये एकुण ९४ ग्रामपंचायती असून नेवासा शहरासाठी एक नगर पंचायत आहे. तसेच वाड्या वस्त्याही आहेत. सदर परिसराकरीता पोलीस ठाण्याच्या ५ बिट्स आहेत.

(२) व (३) नेवासा पोलीस ठाण्याकरीता ०१ पोलीस निरीक्षक, ०२ पोलीस उपनिरीक्षक व ६४ पोलीस कर्मचारी या प्रमाणे मनुष्यबळ व १ पोलीस वाहन उपलब्ध आहे. सदर पोलीस ठाण्याचे संख्याबळ वाढवून मिळणेबाबत स्थानिक नागरीक व पदाधिकारी यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे परंतू उपविभागीय कार्यालय निर्माण करणेबाबतचे निवेदन स्थानिक नागरीक व पदाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले नाही. सन २०१७ चे सर्वसाधारण बदल्यामध्ये नेवासा पोलीस ठाण्याकरीता पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या मंजूर पदांपेक्षा जास्तीचे मनुष्यबळ पुरविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध न्यायालयात भ्रष्टाचाराचे खटले प्रलंबित असल्याबाबत

**(४०) ७९८०३ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध न्यायालयात भ्रष्टाचाराचे तब्बल ३२५१ खटले प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खटले प्रलंबित असण्याची कारणे काय असून खटले निकाली काढण्याकरिता शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०१७)** :(१) होय, लाचलुचपत प्रतिबंध कायदा,१९८८ खाली सुमारे ५४३० खटले प्रलंबित आहेत.

(२) अ) सदर खटले प्रलंबित राहण्याची कारणे पुढिलप्रमाणे आहेत.

i) लाचलुचपत प्रतिबंध कायद्याखाली प्रलंबित खटल्यातील पुरावे हे अत्यंत लांबलचक व किचकट असणे, साक्षीदार निश्चित केलेल्या तारखेस गैरहजर असणे, बऱ्याचवेळी साक्षीदाराच्या गैरहजेरीमुळे, कोणत्याही प्रगतीशिवाय खटल्यांबाबतची कार्यवाही पुढे ढकलावी लागते.

ii) केंद्रीय अन्वेषण विभागाकडून साक्षीदार नियमितपणे हजर केले जात नाहीत. काही वेळा केंद्रीय अन्वेषण विभागाकडून सादर करण्यात आलेले पुरावे इतके लांबलचक असतात की, ते तपासण्यात ५ ते ६ तारखा (सीटींग्ज) लागतात.

iii) काही प्रकरणातील विशेष वकील बदलल्यामुळे नवीन वकीलांना खटल्यातील तथ्य आणि पुरावे यांच्याशी परिचित होईपर्यंत त्यांना सदर खटला पुढे चालविणे शक्य होत नाही.

आ) प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजना:

i) लाचलुचपत प्रतिबंध कायद्याखालील प्रलंबित खटले त्वरेने निकाली काढण्यासाठी मा. उच्च न्यायालयातील न्यायामूर्तींच्या अध्यक्षतेखाली देखरेख समिती गठीत करण्यात आली आहे.

ii) लाचलुचपत प्रतिबंध कायद्याखालील प्रलंबित खटले प्राथम्याने निकाली काढण्याच्या व प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याच्या सूचना सर्व संबंधित न्यायिक अधिकारी यांना देण्यात आलेल्या आहेत.

iii) केंद्रीय अन्वेषण विभागाचे खटले जे न्यायिक अधिकारी चालवितात त्यांना चार महिन्याच्या कालावधीत ९ खटले निकाली काढण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. सदर उद्दिष्ट पुर्ण न करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत “Grossly Inadequate” असे प्रतिकूल शेरे देण्यात येवून ते मा.पालक न्यायाधिशांना सादर करण्यात येतात.

iv) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ खालील (राज्य शासनाच्या यंत्रणेकडून तपासणी झालेले) प्रलंबित खटले त्वरेने निकाली काढण्यासाठी सत्र न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, तदर्थ अतिरिक्त सत्र न्यायाधीश व सहायक सत्र न्यायाधीश यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्हयातील चांदूर बाजार, शिरजगाव कसबा, परतवाडा इ. पोलिस स्टेशन तसेच पोलीस कर्मचारी निवासस्थान इमारतींच्या बांधकामास मंजुरी देण्याबाबत

**(४१) ८१२७० (२१-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर बाजार, शिरजगाव कसबा, परतवाडा इ. पोलिस स्टेशन तसेच पोलीस कर्मचारी निवासस्थान इमारतींच्या बांधकामास तातडीने मंजुरी द्यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. राज्यमंत्री, गृह यांचेकडे दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ६० वर्षे जुनी असलेल्या पोलीस स्टेशनची इमारत कधीही कोसळून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

पोलीस ठाणे चांदूर बाजार यास दिनांक १६/०३/२०१७ रोजी, पोलीस ठाणे शिरसगाव कसबा यास दिनांक १९/०६/२०१७ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून परतवाडा येथील पोलीस निवासस्थानाबाबत व चांदुर बाजार येथील निवासस्थानाबाबत प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे माजी सैनिकांच्या मुलांसाठी विद्यार्थी वसतीगृह स्थापन करण्याबाबत

**(४२) ८२२८१ (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेऊर (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे माजी सैनिकांच्या मुलांसाठी विद्यार्थी वसतीगृह स्थापन करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१०-०८-२०१७) :**(१) होय, खरे आहे.

(२) जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर यांनी तहसीलदार, करमाळा, जिल्हा सोलापूर येथे करमाळा तालुक्यात जेऊर येथे सैनिकी मुला/मुलींचे वसतीगृह स्थापन करण्यासाठी कमीत कमी १० गुंठे जमीन मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) येथील जेऊर व जिंती येथे पोलीस स्टेशन इमारत उभारण्याबाबत

**(४३) ८२२८२ (२०-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा मतदारसंघातील (जि.सोलापूर) जेऊर व जिंती येथे पोलीस स्टेशन इमारत उभारण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) क्षेत्रीय कार्यालयाकडून उक्त प्रकरणी जेऊर व जिंती येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याची आवश्यकता असल्यास शासनास प्रस्ताव सादर करण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोलीस शिपाई पदाच्या सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती करण्याबाबत

**(४४) ८३५३८ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस दलात पोलीस शिपाई या पदावर सन २०११ व त्यानंतर भरती झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना आंतरजिल्हा बदली अनुदेय नसल्याची पोलीस शिपाई या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतूद रद्द करून सेवाप्रवेश नियमात दुरुस्ती करणेबाबत लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ डिसेंबर, २०१६ रोजीच्या सुमारास मा.गृहराज्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०८-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) महासराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम-११ मध्ये दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## धुळे जिल्हा सरकारी वकिल व पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावर केलेली नियुक्ती नियमबाहय असल्याबाबत

**(४५) ८६३२८ (०४-०९-२०१७). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने श्री.सुनिल पोपटलाल जैन या वकिलाची दिनांक ५ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास धुळे जिल्हा सरकारी वकिल व पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावर केलेली नियुक्ती नियमबाहय आहे, असे नमूद करून मुंबई उच्च न्यायालयाने ही नेमणूक रद्द केली असल्याची माहिती दिनांक ११ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(३) असल्यास, सर्व नियम गुंडाळून त्यांची नियुक्ती करण्याकरीता ज्या अधिका-यांनी प्रस्ताव तयार केला व ज्यांनी शिफारस केली अशा सर्व व्यक्तींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०९-२०१७) :**(१) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.०६.०६.२०१७ रोजीच्या आदेशान्वये श्री. सुनिल जैन यांची जिल्हा सरकारी वकील, धुळे या पदावरील नियुक्ती रद्द केली आहे.

(२) मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.९०००/२०१६ अन्वये दाखल केलेल्या याचिकेवर दि.०६.०६.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने ॲड. सुनिल जैन यांची उपरोक्त पदावरील नियुक्ती रद्दबातल झाली आहे. ॲड.सुनिल जैन हे आता जिल्हा सरकारी वकील पदावर कार्यरत नसल्याने चौकशी करण्यात आली नाही.
(३) ॲड. जैन यांच्याबाबत मुलाखत समितीचे अभिप्राय शासनास प्राप्त झाल्यानंतर शासनाने त्यांची नियुक्ती जिल्हा सरकारी वकील पदावर नियुक्ती केली असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विक्रोळी येथिल कन्नमवार नगरामधील महानगर दंडाधिकारी यांचे सुसज्ज नवीन न्यायालय उभारण्याबाबत**

**(४६) ८७९४३ (०४-०९-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रोळी येथिल कन्नमवार नगरामध्ये म्हाडाच्या दुकानांच्या इमारतीत सन १९८९ पासून १ लाख रुपये भाडे तत्वावर महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या न्यायालयात सहा न्यायालय भरली जातात, तसेच २५० वकील आणि तेवढेच कर्मचारी काम करीत असल्याने न्यायालयासाठी ही जागा अपूरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या न्यायालयाच्या बाजूलाच आरक्षित असलेल्या तब्बल बाराशे चौरस मीटरच्या जागेत सुसज्ज असे न्यायालय सुरु करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रस्तावाची सद्यःस्थिती काय आहे व तद्‌नुसार सदर नवीन न्यायालय उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही. विक्रोळी येथील महानगर दंडाधिकारी न्यायालय, हे म्हाडाच्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर सुरु नसून विधि व न्याय विभागाच्या मालकीच्या जागेत सदर न्यायालयाचे कामकाम सुरु आहे.
(२) हे अंशतः खरे आहे. प्रस्तुत न्यायालय विधि व न्याय विभागाच्या मालकीच्या जागेत सुरु असले तरी, सदरील न्यायालयास ही जागा अपुरी पडते.
(३) हे अंशतः खरे आहे. प्रस्तुत न्यायालया लगतचा विधि व न्याय विभागाच्या मालकीचा भूखंड क्र. ३५६/अे-२, येथील सुमारे २०९८.७५ चौ.मी. क्षेत्र इतक्या जागेवर नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याचे प्रस्तावित आहे. विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सीसीबी-१११३/ ११६०/ प्र.क्र.२१४/का.१३, दि.२२/५/२०१५ नुसार सदर कामास रु.४३,५०,९७,६६६/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) सदर न्यायालयासाठी आरक्षित भूखंड क्र. ३५६/अे-२ वर बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप विकास योजना-२०३४ मध्ये, बहुद्देशिय सामाजिक केंद्र असे आरक्षण दर्शविण्यात आले आहे.
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार सदर भूखंड क्र. ३५६अे/२ न्यायालयासाठी आरक्षित करण्याबाबत आवश्यक प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडून नगर विकास विभागास दि. २५/७/२०१७ रोजी पाठविण्यात आला आहे.
याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लार्सन ॲन्ड टुब्रो एम्प्लाईज वेलफेअर फाऊंडेशनच्या नावाखाली कर्मचा-यांच्या पगारातून कापून घेतलेल्या १७६ कोटी रुपयांचा अपहार झाल्याबाबत**

**(४७) ८९३९५ (०४-०९-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लार्सन ॲन्ड टुब्रो एम्प्लाईज वेलफेअर फाऊंडेशनच्या नावाखाली कर्मचा-यांच्या पगारातून सन २००४ ते २००९ या कालावधीत कापून घेतलेल्या १७६ कोटी रुपयांचा अपहार झाल्याची बाब माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणा-या व्यक्तींवर कारवाई करुन कामगारांना त्याचे पैसे परत मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२१-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**इचलकरंजी (जि.कोल्हापुर) येथे कामगार न्यायालयाचे कॅम्प कार्यालय सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४८) ९०८३१ (०४-०९-२०१७). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापुर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे वस्त्रोद्योग, फॉन्ड्री उद्योग व इतर अनेक उद्योग कार्यरत असून कामगारांची संख्या दीड लाखांच्यावर असल्यामुळे इचलकरंजी येथे कामगार न्यायालयाचे कॅम्प कार्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव गत तीन वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायाधिश कंथारिया समितीच्या शिफारशीनुसार ८०० ते १००० प्रकरणांसाठी एक कामगार न्यायालय स्थापन करण्यात येत असून इचलकरंजी येथील १५०० हून अधिक दावे प्रलंबित असल्यामुळे या समितीच्या निकषात सदरचा प्रस्ताव पात्र ठरतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर न्यायालय स्थापन होण्याबाबत अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२२-०९-२०१७)** :(१) होय.

कोल्हापूर येथील कामगार न्यायालयात इचलकरंजी, (जिल्हा-कोल्हापूर) येथील दिनांक ३१/०३/२०१३ रोजी प्रलंबित असलेल्या ९९९ प्रकरणांची संख्या विचारात घेता कोल्हापूर येथे कार्यरत असलेल्या दोन कामगार न्यायालयापैकी एका कामगार न्यायालयास इचलकंरजी येथे दरमहा एक आठवडा कोर्ट कॅम्प घेण्यासाठी इचलकरंजी येथील न्यायालयातील एक कक्ष (फर्निचरसह) उपलब्ध करुन देण्याबाबत मुख्य जिल्हा न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांना दिनांक २९/०३/२०१२ च्या पत्रान्वये तसेच मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांना दिनांक २६/०४/२०१३ च्या पत्रान्वये औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र, मुंबई यांचेकडून विनंती करण्यात आली होती.

इचलकरंजी येथील न्यायालयात जागा उपलब्ध होताच कोल्हापूर येथील कामगार न्यायालयाचा दरमहा १ आठवडा कॅम्प घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. असे कळविण्यात आले होते. तथापि, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून इचलकरंजी येथे कोर्ट कॅम्पकरिता अद्याप जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे इचलकरंजी येथे कोर्ट कॅम्प सुरु करणे शक्य झालेले नाही.

(२) कंथारिया समितीच्या शिफारशीस अनुसरुन ८०० ते १००० प्रकरणांसाठी एक कामगार न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव आहे, हे खरे आहे. परंतु कामगार न्यायालय कोल्हापूर अंतर्गत दोन कामगार न्यायालये अस्तित्वात असून कामगार न्यायालय, कोल्हापूर येथील एकूण १५१३ प्रलंबित प्रकरणांपैकी इचलकरंजी येथील ३३५ प्रकरणे दिनांक ३१/०८/२०१७ रोजी प्रलंबित आहेत. इचलकरंजी येथील प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांची संख्या लक्षात घेता, कंथारिया समितीच्या निकषानुसार इचलकरंजी येथे नवीन कामगार न्यायालय निर्माण करण्याचा प्रस्ताव पात्र ठरत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

---

**टेंभूर्ली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील १५० एकर जमिनीची अवैध विक्री केल्याबाबत**

**(४९) ९३१८४ (१२-०८-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेंभूर्ली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील श्री.नारायण कृष्णराव देशमुख यांच्या १५० एकर जमिनीची एका व्यक्तीने बनावट कागदपत्रे तयार करून विक्री केल्याचे व प्रांत कार्यालयातून या जमिनीच्या नस्ती गहाळ झाल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार सदर जमिनीची बनावट कागदपत्राच्या आधारे विक्री करणाऱ्या व्यक्तीवर व या प्रकरणात समाविष्ट असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

श्री. नारायण देशमुख यांच्या नावे ५२ एकर ५ गुंठे एवढे क्षेत्र मौ. टेंभुर्ली ता. शहापूर या गावी होते. अर्जदार श्री. केशव भेरे यांनी दिनांक २३.६.२०१७ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने तहसिलदार, शहापुर यांच्या अहवालानुसार खरेदीखत दस्त क्र. ९२/१९९६ च्या सत्यतेबाबत साशंकता निर्माण होते. प्रांत कार्यालयातून नस्ती गहाळ झाल्याची बाब दिसून येत नाही.

(२) व (३) सन २००१ मध्ये किन्हवली पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४६/२००१, भा.दं.वि. कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यामध्ये ४ आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी श्री. विनायक दाजी चौधरी यांच्या नावावर असलेली शेतजमीन सर्व्हे क्र. ३६३/१ चे क्षेत्र ०-१२-० आर व सर्व्हे क्र. ३६४/२ चे क्षेत्र ०-३६-० आर व साक्षीदार सौ. रंजना चौधरी यांच्या नावावर असलेली शेतजमीन सर्व्हे क्र. ३६३/२ चे क्षेत्र ०-४५-३ आर तसेच, गावातील इतर काही इसमांची जमीन सर्व्हे क्र. ३६४/५, ३५६/३, ३६५/१ ही जमीन बनावट कुलमुखत्यारपत्र तयार करुन त्यावर खोट्या सह्या, अंगठे देऊन फिर्यादी व साक्षीदार हजर नसतांना व त्यांना ओळखत नसतांना सुध्दा ओळखतो म्हणून सही केल्याने व नमूद सर्व्हे क्रमांकाची जमीन परस्पर विक्री करुन फसवूणक केल्याबाबत उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

नमूद आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) कायदा १९८१ च्या कलम २३ अंतर्गत देण्यात आलेल्या सूट प्रकरणी करण्यात आलेल्या तक्रारीबाबत**

**(५०) ९३५९४ (०४-०९-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ३२ प्रमुख नियोक्ते की जे सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरिता या मंडळात मुख्य मालक (प्रिसिंपल एम्प्लायर) म्हणून अगोदरच नोंदणीकृत आहेत, अशा मुख्य मालकांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) कायदा १९८१ च्या कलम २३ अंतर्गत सूट देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा प्रकारची सूट दिल्यामुळे खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ (सुधारणा) मधील खंड १३(ख) आणि खंड २६ (४) च्या तरतूदीचा भंग झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी श्री.अशोक पाटील, सरचिटणीस सुरक्षा रक्षक कामगार युनियन, मुंबई यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास व तद्नंतर पुन्हा मागील दीड वर्षापासून सातत्याने प्रधान सचिव (कामगार) उद्योग उर्जा व कामगार विभाग, कामगार आयुक्त, मुंबई आदींकडे निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२७-०९-२०१७) :**(१) बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याकरीता या सुरक्षा रक्षक मंडळामध्ये "मुख्य मालक" म्हणून अगोदर नोंदणीकृत आहेत अशा मुख्य मालकांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम,१९८१ च्या कलम २३ अन्वये सुट देण्यात आलेली नाही.

तथापी सदर मंडळात नोंदीत असलेल्या कारखाने व आस्थापनेमध्ये खाजगी एजन्सी मार्फत कार्यरत असणा-या खाजगी सुरक्षा रक्षकांना त्यांनी शासनाकडे केलेल्या अर्जानुसार उक्त अधिनियमातील कलम २३ नुसार अधिसुचना निर्गमीत करुन सुट दिली आहे हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ (सुधारीत) च्या खंड २६ (४) चा भंग झाला आहे.
(३) श्री.अशोक पाटील, सरचिटणीस, सुरक्षा रक्षक कामगार युनियन यांचे दि. ३/०९/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी मंडळाच्या निरीक्षकांनी सदर आस्थापनांना भेटी देऊन निरीक्षण शेरे पारीत केले आहेत. त्यानुसार १७ मुख्य मालकांच्या आस्थापनांनी सुरक्षा रक्षक मंडळाकडुन नोंदीत सुरक्षा रक्षक घेतले आहेत. २० मुख्य मालकांच्या आस्थापनांना दिलेल्या सुटीचा कालावधी संपुष्टात आलेला आहे, तर ९ मुख्य मालकांची आस्थापना कायमस्वरुपी बंद झाल्या आहेत. १९ दोषी आस्थापनापैंकी ७ आस्थापनाविरुध्द उक्त अधिनियमांतर्गत वर नमुद योजनेच्या खंड २५ (२) अंतर्गत विविध न्यायालयामध्ये खटले दाखल केले आहेत. तर उर्वरीत १२ आस्थापनांवर खटले दाखल करण्याचे प्रस्तावित आहेत.

मा.मंत्री (कामगार) यांनी दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत एजन्सीं विरुध्द केलेल्या कारवाईचा घटनाक्रम संदर्भातील माहितीबाबत सविस्तर अहवाल मंडळाकडून मागविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.